# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः11.06.2025** **वारःबुधवार**

---

1. बहुपक्षीय शिष्टमंडळाचा देशाला अभिमान-पंतप्रधानांचे गौरवोद्गार
2. 2029 पर्यंत देशाची संरक्षण उत्पादन क्षमता 3 लाख कोटी रुपयांपर्यंत वाढवण्याचं उद्दिष्ट-संरक्षणमंत्री राजनाथ सिंग यांचं प्रतिपादन
3. पुर व्यवस्थापन तंत्रआधारित यंत्रणेच्या माध्यमातून करावं-गृहमंत्री अमित शहा यांचे निर्देश
4. अंतराळ संशोधनासाठीची अक्सिओम-4 ही मोहीम तांत्रिक कारणानं तुर्त स्थगित आणि
5. राजस्थानमध्ये पुढील तीन दिवस उष्णतेच्या लाटेची शक्यता

**पंतप्रधान**

पेहलगाम दहशतवादी हल्ला आणि त्याला प्रत्युत्तरादाखल राबवलेलं ऑपरेशन सिंदूरच्या पार्श्वभूमीवर दहशतवादाचं उच्चाटन करण्याची गरज याबाबत भारताची भुमिका स्पष्ट करण्यासाठी विविध देशांत गेलेल्या बहुपक्षीय शिष्टमंडळाचा आपल्याला अभिमान असल्याचे गौरवोद्गार पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल काढले. नवी दिल्लीत या शिष्टमंडळाची भेट घेतली आणि त्यांच्या अनुभवांबद्दल संवाद साधला. या प्रतिनिधींनी विविध 33 देशांतील राजधानीच्या ठिकाणांना भेट दिली आणि राजकीय तसंच सामाजिक स्तरावरील व्यक्तींशी संवाद साधला. दहशतवादाविरोधात काम करण्याची गरज आणि शांततेसाठीची भारताची वचनबध्दता याबाबच त्यांनी भारताची भुमिका स्पष्ट केली. सर्व प्रतिनिधींचा आपल्याला अभिमान आहे असं पंतप्रधानांनी आपल्या समाजमाध्यमावरील संदेशांत म्हटलं आहे. जागतिक शांततेसाठी भारताच्या वचनबद्धतेला या मित्र राष्ट्रांनी चागला पाठिंबा दिल्याचं सांगत शिवसेनेचे श्रीकांत शिंदे यांनी पंतप्रधानांचे आभार मानले.

**राजनाथ सिंग**

2029 पर्यंत देशाची संरक्षण उत्पादन क्षमता 3 लाख कोटी रुपयांपर्यंत वाढवण्याचं उद्दिष्ट असल्याचं संरक्षणमंत्री राजनाथ सिंग यांनी काल सांगितलं. उत्तराखंडमधील देहरादून इथं आयोजित 'राष्ट्रीय सुरक्षितता आणि दहशतवाद' या विषयावरील कार्यक्रमाला संबोधित करताना ते बोलत होते. या क्षेत्रातील देशाची निर्यात 50 हजार कोटी रुपयांपर्यंत पोहोचेल. अशी आशाही त्यांनी व्यक्त केली.

2014 मध्ये वार्षिक एकंदर 40 हजार कोटी रुपये असलेलं संरक्षण उत्पादन आज सव्वा लाख कोटी रुपयांपेक्षा अधिक झालं आहे आणि हा आतापर्यंतची ही विक्रमी आकडेवारी आहे. भारतीय बनावटीची ही उत्पादनं 100 हून अधिक देशांत निर्यात केली जातात. केंद्र सरकारनं यावर्षी पावणेदोन लाख कोटी रुपयांच्या संरक्षण उत्पादनाचे लक्ष्य ठेवले आहे. अशी माहितीही त्यांनी योवेळी दिली.

**अमित-शहा**

आगामी पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर देशातील पूर व्यवस्थापनाच्या तयारीचा आढावा घेण्यासाठी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या अध्यक्षतेखाली काल नवी दिल्ली इथं उच्चस्तरीय बैठक झाली. नदीच्या आसपास पुराचा धोका कमी करण्यासाठी राबवण्यात आलेल्या उपाययोजनांचा तसंच गेल्या वर्षी झालेल्या बैठकीत घेतलेल्या निर्णयांवर कोणती पावले उचलली आहेत याचा आढावा त्यांनी घेतला. नवीन तंत्रज्ञानावर आधारित यंत्रणा, पूर व्यवस्थापनासाठी परस्पर सहकार्यानं कसं काम करेल यावर सविस्तर चर्चा झाल्याचं गृह मंत्रालयाने दिलेल्या निवेदनात म्हटले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली,

मार्गदर्शक सुचनांचं पालन करुन या पावसाळ्यात सर्व स्तरावर अपघात टाळून आपत्ती व्यवस्थापन कराव अशा सूचना देण्यात आल्या आहेत.

**सुशासन**

गेल्या 11 वर्षांत देशाच्या संरक्षण क्षेत्रात लक्षणीय बदल होत असून देश आत्मनिर्भर होण्याच्या दिशेने गतीने वाटचाल करत आहे, अस प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. देशानं आधुनिकीकरण आणि संरक्षण उत्पादनाच्या बाबतीत स्वयंपूर्ण होण्यावर लक्ष केंद्रित केलं आहे. देशाचे नागरीक आपल्या देशाला अधिक मजबूत बनवण्याचा संकल्प घेऊन एकत्र आल्याचं पाहून आनंद होत असल्याचं मोदी यांनी समाज माध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे.

दरम्यान, केंद्रातील मोदी सरकारला 11 वर्ष पूर्ण झाल्याच्या पार्श्वभूमीवर काल देशातील भाजपच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय लोकशाही आघाडी शासित राज्यांच्या मुख्यमंत्र्यांनी पत्रकार परिषद घेऊन केंद्र सरकारच्या कामाचा लेखाजोखा मांडला.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालचं सरकार गतीशील आणि निर्णयक्षम असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल मुंबईत पत्रकार परिषदेत सांगितल. सरकारने एका वर्षात 30 लाख घरं देण्याचा विक्रम केला, 81 कोटी लोकांना मोफत अन्नधान्य, 15 कोटी घरांना नळजोडणी, 12 कोटी घरांमधे शौचालय दिलं असंही मुख्यमंत्र्यांनी सांगितलं. देशाची संरक्षण क्षेत्रातील आत्मनिर्भरता या बाबत बोलताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले....

**पाच हजार अशी उपकरणं जी आपण आयात करत होतो ती शंभर टक्के आता भारतामध्ये बनतात आणि आपण त्याचा निर्यात करतो संरक्षण दलासाठी आपल्या स्टार्टअप आणि एमएस मधनं भारतातल्या केंद्र सरकारनं चोवीस हजार कोटी रुपयांची खरेदी केली आहे म्हणजे आपली आत्मनिर्भरता त्यातनं दिसते आणि ज्या काही आपल्या ऑर्डनन्स फॅक्टरी आहेत यातल्या सात ऑर्डनन्स फॅक्टरी या सार्वजनिक उपक्रमाच्या माध्यमातून नव पद्धतीची संरक्षण सामग्रीचं उत्पन्न करत आहेत आणि त्यातल्या सहा नफ्यात आहेत आपण त्यातून एक्सपोर्ट करतो संरक्षण निर्यातीमध्ये चौतीस पट वाढ झालेली आहे संरक्षण क्षेत्रामध्ये चौऱ्याहत्तर टक्के एफडीआय आलेला आहे ऑपरेशन कावेरी सारखं ऑपरेशन राबवून सुदानमधनं तीन हजार भारतीय आपण परत आणले युक्रेनमधनं तेवीस हजार भारतीय सुरक्षित परत आणले त्यामुळे एकूणच भारतीयांचं महत्व भारतीय पासपोर्टचं महत्त्व भारतीयांच्या जीवनाचं महत्त्व हे ओळखून त्या प्रकारचं काम आपण केलं आहे.**

**पियुष-गोयल**

नवोपक्रमाला चालना देणं, भागीदारी सुलभ करणे आणि संयुक्तरित्या कौशल्यपुर्ण प्रशिक्षण देणं ही यांत्रिक, विद्युत आणि धातू उद्योग अर्थात् MEM क्षेत्रासाठी आवश्यक असल्याचं केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पियुष गोयल यांनी काल स्विटझरलँडमध्ये बर्न इथं सांगितलं. स्विस फेडरलचे सल्लागार गाय पार्मेलिन यांच्याबरोबर MEM उद्योगाशी संबंधित उत्पादकांची गोलमेज परिषद काल झाली. या परिषदेचं सहअध्यक्षपद गोयल यांनी भूषवलं त्यावेळी ते बोलत होते. स्विस उद्योजक आणि भारतीय गुंतवणुकीला प्रोत्साहन देण्यासाठी औद्योगिक सहकार्य मजबूत करण्यासाठी, नवोन्मेष, तंत्रज्ञानावर आधारित प्रगती आणि कौशल्य विकासाला चालना देण्यासाठी भारतीय व्यवसायिक गट असलेली संघटना ASSOCHAM आणि स्विसमेम यांच्यात झालेल्या सामंजस्य करारावर यावेळी स्वाक्षरी झाली. उद्योगिक परिषदेव्यतिरिक्त, गोयल यांनी सनदी लेखापाल प्रशिक्षण संस्था अर्थात ICAI च्या स्वित्झर्लंड विभागाच्या सदस्यांचीही भेट घेतली. भारतातील गुंतवणुकीसाठी इनव्हेस्ट इंडिया या उपक्रमांत गुतंवणूक करण्याचं उद्योजकांना आवाहन केलं.

**मोहीम**

नासाच्या केनेडी स्पेस सेंटरवरून आज संध्याकाळी अक्सिओम- 4 ही नियोजित असलेली मोहीम तांत्रिक कारणानं सध्या स्थगित करण्यात आली आहे. या मोहिमेची पुढची तारिख लवकरच जाहीर करण्यात येईल अशी माहिती भारतीय अंतरिक्ष

संशोधन संस्थेनं दिली आहे. या ऐतिहासिक मोहिमेत अमेरिका, भारत, पोलंड आणि हंगेरीचे अंतराळवीर 14 दिवसांच्या वैज्ञानिक मोहिमेसाठी आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावर घेऊन जाणार आहे. हे अंतराळवीर विविध संशोधनं करणार आहेत. मोहिमेतील चार अंतराळवीरांमध्ये भारताताच्या वायु दलातील ग्रुप कॅप्टन शुभांशू शुक्ला यांचा समावेश आहे. तसंच पोलंडमधील स्लावोस उझनान्स्की, हंगेरीचे टिबोर कापू आणि अमेरिकेतील पेगी व्हिटसन हे सोबत असतील.

**<u>अमेरिका</u>**

सॅन फ्रान्सिस्कोमधील एका न्यायाधीशाने कॅलिफोर्नियाचे गव्हर्नर गॅविन न्यूसम यांची लॉस एंजेलिसमध्ये मरीन आणि नॅशनल गार्ड सैन्य तैनात करण्यापासून ट्रम्प प्रशासनाला रोखण्यासाठी तत्काळ प्रतिबंधात्मक आदेश देण्याची विनंती फेटाळून लावली आहे. न्यायाधीश चार्ल्स आर ब्रेयर यांनी सॅन फ्रान्सिस्को राज्याच्या तात्पुरत्या प्रतिबंधात्मक आदेशाच्या विनंतीवर पुढील विचार करण्यासाठी उद्या सुनावणीची तारीख निश्चित केली आहे. या न्याय विभागाने राज्याच्या विनंतीला कायदेशीररित्या निरर्थक असल्याचं सांगत ती मंजूर केल्याने गृह सुरक्षा विभागाच्या कर्मचाऱ्यांची सुरक्षितता धोक्यात येऊ शकते आणि कामकाजात व्यत्यय येऊ शकतो. असा इशारा दिला आहे. अमेरिकन सरकारविरोधात कॅलिफोर्नियातील लॉस एंजिलिसमध्ये निदर्शनं सुरु आहेत.

**<u>जयशंकर</u>**

या वर्षअखेरीस होणाऱ्या भारत आणि युरोपीय संघ यांच्यातील मुक्त व्यापार कराराला परराष्ट्र मंत्री एस जयशंकर यांनी समर्थन दिलं आहे. युरोपीय संघाचे परराष्ट्र आणि सुरक्षा धोरणांचे उच्च प्रतिनिधी काजा काल्लास यांच्याबरोबर झालेल्या संयुक्त पत्रकार परिषदेत ते काल बोलत होते. जयशंकर हे एक आठवड्याच्या युरोपच्या दौऱ्यावर आहेत.

**<u>नवी-दिल्ली</u>**

दिल्ली सरकारनं राष्ट्रीय राजधानीतील खाजगी शाळांकडून अनधिकृतरित्या शुल्कवाढीचं नियमन करण्यासाठी दिल्ली शालेय शिक्षण अर्थात शुल्क निर्धारण आणि नियमनात पारदर्शकता अध्यादेशाला मान्यता दिली आहे अशी माहिती शहराचे शिक्षण मंत्री आशिष सूद यांनी माध्यमांना दिली. राष्ट्रपतींच्या संमतीनंतर, हा अध्यादेश या वर्षी एप्रिलपासून पूर्वलक्षी प्रभावाने लागू होईल असे त्यांनी सांगितले.

**<u>हवामान</u>**

हवामान विभागाने पुढील तीन दिवसांत राजस्थानमध्ये तीव्र उष्णतेच्या लाटेची शक्यता वर्तवली आहे. उत्तर प्रदेश, पंजाब, जम्मू आणि काश्मीर, लडाख, गिलगिट, बाल्टिस्तान, मुझफ्फराबाद, हिमाचल प्रदेश, हरियाणा आणि मध्य प्रदेशमध्येही उष्णतेच्या लाट राहील असा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं

# नमस्कार.